
# पिसाची डायरी

श्रीकांत वाघ

**शुक्रवार, २८ ऑगस्ट २००९**

आज पहाटेच उठून पाच हजार शब्दांचा संधिवाताचा एक लेख पुरा केला. जवळ जवळ तीन महिन्यांपासून हे काम अर्धवट राहिले होते. दिवसभराच्या कामातून अशा गोष्टींसाठी वेळ काढणे फार अवघड. अखेर दोन दिवस सकाळी हॉस्पिटल्सना रजा घेतली आणि आज तो पुरा केला. आता तो क्लिनिकमधल्या डॉक्टर उषाकडून छान अक्षरात लिहून घेतला म्हणजे झाले.

घरात महालक्ष्म्यांच्या जेवणाची गडबड. वीणा (पत्नी) पहाटेपासूनच स्वयंपाकघरात गुंतली होती. लेख लिहून झाल्यावर ऑनलाइन चेकइन करण्यात जवळ जवळ तासभर गेला. शेवटी ते झालेच नाही. काय झाले होते कोणास ठाऊक; गेल्या वेळी अमेरिकेला मिहिरकडे (मुलाकडे) जाताना ऑनलाइन चेकइन करता आल्याचा मला केवढा आनंद झाला होता. एक वाजता बॅग आवरायला सुरुवात केली. वीणाने मध्ये येऊन कपडे ठरवण्यास फक्त मदत केली. तशा अधूनमधून तिच्या सूचना चालू होत्याच. तास-दीडतासात बॅग भरून झाली. गेल्या तीन-चार वर्षांत बॅगा भरायची मला भरपूर सवय झाली आहे. तरीही एकट्याने अशा अनोळखी ठिकाणी जाताना मनावर एक प्रकारचे दडपण येते. पूर्वी मी असाच सिंगापूर आणि जर्मनीला एकटाच गेलो होतो. आताशा या सगळ्यांचा काहीसा कंटाळा येऊ लागला आहे. प्रवासातला एकटेपणा विशेष बोअर होतो.



विमान शनिवारी पहाटे अडीच वाजता. त्यामुळे आज संध्याकाळीच निघायचे होते. संध्याकाळी साडेपाच वाजताची ट्रॅव्हल कंपनीची गाडी जवळ जवळ तासभर उशिरा आली. धड विश्रांतीही मिळाली नाही. ड्रायव्हर जरा विचित्रच होता. धादांत खोटे बोलण्यात ट्रॅव्हलवाले पटाईत. पूर्वी कितीतरी वेळा मी हे अनुभवले आहे. मला घेऊन ती गाडी डहाणूकर कॉलनीत गेली. माझ्या आधी त्या गाडीत मॉडेल कॉलनीतून एक मनुष्य बसला होता. हा ड्रायव्हर दोन तास आपल्याला पुण्यात फिरवून मुंबईला पोचायला उशीर करतोय या विचाराने चिंताक्रांत झालेला. डहाणूकर कॉलनीत एक तरुण जोडपे गाडीत चढले. त्यांचे सिंगापूरचे विमान अकरा वाजताचे होते. गाडी सात वाजता चांदणी चौकात आली. मग काय? शंभर-सव्वाशेच्या वेगाने ड्रायव्हर गाडी चालवू लागला. मी पुढे ड्रायव्हरशेजारी बसलो होतो. दुसरे गृहस्थ झोपी गेले होते. मधूनच आरसा फिरवून ड्रायव्हर त्या जोडप्याच्या चाळ्यांकडे पाही. लोणावळ्याजवळ दोनदा जोरदार पाऊस लागला. तेव्हा त्याला हळू चालवायला सांगावे लागले. अखेर वाटेत कोठेही न थांबता दहा वाजताच आम्ही सहार विमानतळावर पोचलो. मला अजून बराच वेळ होता म्हणून बाहेरच सामोसे आणि सॅन्डविच खाऊन नंतर आत गेलो. बोर्डिंग पास घेऊन आणि इमिग्रेशन सिक्युरिटी आटोपून गेटपाशी एका कोपऱ्यातल्या खुर्चीवर वाचत बसला. मागे एक मित्र म्हणाला होता की गर्दीत वाचत असणारा मनुष्य म्हणजे डॉ. वाघ, असे ओळखावे.

विमानात शिरताना सुरुवातीला बिझिनेस क्लासच्या मोठ्या सोफ्यासारख्या खुर्च्यांवर माणसे बसलेली असतात. त्यांच्या चेहऱ्यावर मोठेपणाचा भाव असतो आणि आपल्याला मागच्या सामान्य भागात बसायचे म्हणून हीनपणा. सिडनीला औषधाच्या ट्रायलच्या प्रशिक्षणासाठी जाताना एकदाच मी बिझिनेस क्लासमधून गेलो होतो. माझ्यामुळे माझ्या सहकाऱ्यांनाही तेव्हा तीच तिकिटे मिळाली होती. मागे बार्सिलोनाला जाताना कंपनीचे एक अधिकारी म्हणाले होते, ''मी नेहमी बिझिनेस क्लासमधून जात असतो, पण तुम्ही सारे बरोबर आहात म्हणून या वेळी इकॉनॉमी क्लासमध्ये.' भारतातल्या मोठ्या सात-आठ ऱ्हुमॅटॉलॉजिस्टसमोर या माणसाला असे कसे बोलता आले?

विमानात शाकाहारी अन्न मिळेल की नाही ही एक चिंता. परदेशी जाण्याची ही रात्रीची उड्डाणे म्हणजे झोपेचे खोबरे. कमरेला पट्टा लावून तासन्‌तास एका जागेवर अवघडून बसायचे. समोरच्या ट्रेची आणखी एक अडचण. जेवणाचे हालच. या विमानात दही, फळांचे तुकडे, डब्यातला मोसंबीरस, उपमा, उत्तप्पा, सांबार, पाव असे काहीही होते. म्हणजेच आयुर्वेदातले विरुद्धाशनच. मला भूक सहन होत नाही. मिळेल ते खात राहतो. त्यामुळे पित्त चढते, डोके जड होते आणि अंग दुखते. या वेळी झोप मात्र चांगली झाली. लुपसचा एक धडाही वाचून झाला.

**शनिवार, २९ ऑगस्ट २००९**

विमान सकाळी वेळेवर पॅरिसला पोहोचले. तेथे १५-२० मिनिटांतच पोलीस कन्सोलमधून बाहेर पडलो. मुंबईलाही असेच या वेळी पटकन आवरले होते. चौकशी करत चौथ्या गेटपाशी आलो आणि तेथून बसने २G विमानतळावर. पिसाचे विमान निघायला दोन तासांचा अवधी होता. त्यामुळे थोडे खाऊन तिथेच वाचत बसलो. विमानतळाच्या भिंतींवर क्वचित एखादे स्वाइन फ्लूचे पोस्टर लावले होते – अशी लक्षणे दिसली तर डॉक्टरांना भेटा – अशा अर्थाचे. मुंबईलाही गणपतीच्या गर्दीत स्वाइन फ्लूजोगे काही दिसले नाही. पुण्यात मात्र या आजाराने अगदी गोंधळ घातला. जगभर पसरलेली ही साथ. काही लोक मेले असे समजताच अवघे पुणे पांगळे झाले. बाहेरगावचे लोकही पुण्यात येण्यास घाबरू लागले. बाहेरचे पेशंट फोनवरूनच सल्ले विचारू लागले. कमाल आहे! ऱ्हुमॅटॉलॉजीच्या चिकुनगुन्याच्या संधिवाताच्या साथीची एवढी दखल कोणी घेतली नाही. तीन-तीन वर्षे झाली तरी काही लोकांचे सांधे अजूनही सुजलेलेच आहेत.

पॅरिसला प्रादेशिक वाहतुकीचा हा २G विमानतळ. आगारातून एस टी गाड्या बाहेर पडाव्यात तसे दर पंधरा मनिटांनी तीन-चार विमाने बाहेर पडतात. वेळेआधी वीस मिनिटे दरवाजा उघडणार. ते सारे बोर्डावर दिसत असते. वेगळी उद्घोषणा नाही. त्यामुळे शांतता वाटते. मुंबईच्या विमानतळावर सारख्या रेल्वेस्टेशनसारख्या स्पीकर्सवरून अनाउन्समेन्टस् सुरू असतात. दिल्ली, कलकत्ता, बंगलोर – सगळीकडे तसेच. जागेच्या मानाने गर्दीही जास्त. त्यामुळे तिकडे विमानतळावर बसून डोके भणभणू लागते.

विमानतळावर वेगवेगळी माणसे दिसतात. काही लोक झोपाळलेले. कुणी पुस्तक वाचणारे. कुणी वेळ घालवत निर्विकार बसलेले. कुणी गप्पा मारणारे. एखादी पर्समधल्या छोट्याशा आरशात मेक-अप करणारी, तर कुणी बाबागाडीतल्या पोराचे आवरणारी. एक जमिनीवर झोपून पुस्तक वाचत खुर्चीवर दोन्ही पाय टाकून पोटाचे व्यायाम करणारी मुलगीही दिसली. या विदेशी लोकांच्या चेहऱ्यावरचे भाव आपल्याला कधीच कळत नाहीत. त्यांच्या स्वभावाचा अंदाज येत नाही. एक प्रकारचा उपरेपणा सतत जाणवत राहतो. त्यांचे कपडे विचित्र. बायकांचे तर फारच. मागे जर्मनीहून येताना माझ्याशेजारी लांब केसांचा, गोरापान, बायकी चेहऱ्याचा धिप्पाड पुरुष बसला होता. तो आणि त्याच्याबरोबरची बाई कसला तरी बुद्धिबळासारखा पटाचा डाव मांडून तासन्‌तास खेळत होते.

व्हेनिस इथून जवळच आहे. व्हेनिस पुढे बुडणार आहे असे ऐकतो. व्हेनिसमार्गे पिसाला गेलो असतो तर बरे झाले असते. व्हेनिस पाहाच, म्हणून पुण्याला काही मित्रांनी सांगितले होते. एकट्याने असे फिरायला नको वाटते. भाषेचा प्रश्नही

अवघड. इंग्रजी बोलणारे आणि समजणारे जवळपास नाहीतच. त्यांचे इंग्रजी उच्चारही विचित्र. आपण इंग्रजीत विचारले आणि त्याला समजले नाही की त्या सुटाबुटातल्या माणसाच्या चेहऱ्यावरचे भाव विचित्रपणे प्रश्नार्थक होतात. आणि यालाही इंग्रजी समजत नाही म्हणून आपण हिरमुसतो.

सगळी विमाने वेळेवर सुटली. फक्त माझेच विमान पाऊण तास उशिराने निघाले. पन्नासेक आसनांचे छोटेसे विमान. विमानात चढण्यासाठी हातभर रुंदीचा सहा पायऱ्यांचा जिना. एकीकडे दोन आणि दुसरीकडे एक अशी एका रांगेत तीन आसने. मी खिडकीपाशी एकेरी आसनावर बसलो होतो. विमान ट्रकने ढकलत मागे नेऊन धावपट्टीवर आणतात. सुरुवातीला अगदी बैलगाडीसारखे चालते. पण क्षणार्धात वेग घेऊन उडते. विमान तसे कमी उंचीवरून उडत होते. त्यामुळे पॅरिसमधल्या रस्त्यांवरून शिस्तीने चालणाऱ्या मुंगीसारख्या गाड्या आणि आगपेटीसारख्या इमारतींमधून आयफेल टॉवर शोधण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. पुढे पर्वतावरचे बर्फ, ढगांची दुलई आणि समुद्रातल्या कागदी होड्यांसारख्या नावा – दरवेळी नव्याने पाहावेसे वाटणारे विहंगम दृश्य.

पिसाला बाहेर आलो. पुण्याला साऱ्यांनीच इथे भुरट्या चोरांपासून सावध राहण्याचा सल्ला दिला होता. त्यामुळे तिकीट काढून बसचा प्रवास करण्याचा धीर होईना. तिकीटही आपल्यासारखे बसमध्ये मिळत नाही. ते दुसरीकडे विमानतळाच्या इमारतीत काढायचे. टॅक्सीसाठी उभा राहिलो. अधूनमधून एखादी टॅक्सी येई. आपल्याकडे अनेक टॅक्सीवाले ''साब किधर जाना है,'' असे विचारतात. इथे अधूनमधून एखादी टॅक्सी येई. लोक रांगेत उभे होते. एकजण रांग मोडून टॅक्सीत बसला. सामानही आत ठेवले. ते इतरांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी भांडून त्याला टॅक्सीतून खाली उतरायला लावले. अखेर जवळजवळ अर्ध्या तासाने टॅक्सी मिळाली आणि मी हॉटेलवर आलो.

फोसाबंडातले हे सांताक्रोस हॉटेल. १३२५साली बांधले. तिथे भिक्षू राहात. पुढे त्याचे बालगृह झाले. मग संसर्गजन्य रोगांचे रुग्णालय. आणखी पुढे अनेक स्थित्यंतरे होत २००० साली त्याचे हॉटेल झाले. वाड्यासारखी चौकोनी दुमजली इमारत. मध्ये हिरवागार विस्तीर्ण चौक, विटांच्या भिंती, दगडी फरशा, उंच लाकडी कौलारू छप्पर. अशी सारी जुनी वास्तुरचना. लिफ्ट नाही. बॅग आपणच उचलून वर न्यायची. खोलीतल्या सोयीही भुक्कड. हातभर लांबीरुंदीची अंघोळीची जागा इतकी अपुरी की अंग धुताना नळाला धक्का लागून पाणी बंद झाले, की पुण्यासारखे टाकीतले पाणी संपले की काय, अशी शंका यावी. आतापर्यंत मी राहिलेल्या हॉटेल्सपैकी सर्वांत कमी दर्जाचे – सुरतचेच काय ते यापेक्षा वाईट होते.

बॅग उघडली तर पिशवीतले लोशन आणि पावडर डावीकडे सगळीकडे पसरले होते. ते आवरण्यातच तासभर गेला. अंघोळ करून पाहिले तर दुपारचे चार वाजले होते. इकडे घड्याळ साडेतीन तास पुढे. वीणाने (पत्नी) गौरीच्या जेवणाचा डबा दिला होता. त्यातलेच अर्धे खाल्ले आणि झोपी गेलो. उठलो तेव्हा संध्याकाळचे सात वाजले होते.

खाली येऊन रिसेप्शनला कलत्या मनोऱ्याला कसे जायचे ते विचारले. नदीकिनाऱ्याने चालत वीस मिनिटांत पोचशील, अशी रिसेप्शनवरच्या मुलीने माहिती दिली. शाळेच्या पुस्तकात वाचलेला कलता मनोरा पाहण्यासाठी सुमारे अर्धा तास चालत गेलो. पण कसले काय? विचारायला रस्त्यावर माणसेही नाहीत. एखादा भेटला तर त्याला इंग्रजी समजत नाही. नकाशा दाखवला तर हातवारे करत इटालियन भाषेत काही सांगे. आठ वाजेपर्यंत उजेड होता. चोरांची भीतीही होतीच. शेवटी तसाच परत आलो. रात्री पुन्हा दुपारचेच उरलेले जेवलो आणि तास दीड तास अभ्यास करून झोपलो.

कालपासून दीड दिवस या गर्दीत मी एकटाच आहे. कोणाशीही बोलणे नाही. पुण्याला घरी एक फोन लावला. त्याचाही आवाज नीट ऐकू आला नाही. मिनिटाचे एकशेसाठ रुपये वाया गेले. या असल्या कोर्सेसमध्ये पैसे फार खर्च होतात. या वेळी मला धड स्पॉन्सरशिपही मिळाली नाही. देशविदेशात ठिकठिकाणी फिरून इतकी ऱ्हुमॅटॉलॉजी शिकलो की आता फारसे शिकण्याजोगेही राहिले नाही. उगाचच एकटे दुकटे फिरण्यात मला रस नाही; आणि अलीकडे ते झेपतही नाही. घरातली मंडळी असली तर काही मजा. आता पुन्हा घराचे रंगकाम, मिहिरचे लग्न. इतके पैसे खर्च करणे योग्य नव्हते. असो.

**रविवार, ३० ऑगस्ट २००९**

आज सकाळी पाचच्या आधीच जाग आली. आवरून तासभर अभ्यास केला. आणि थोडा व्यायाम करून फिरायला बाहेर पडलो. सकाळची प्रसन्न हवा. एका लेनचे रस्ते. एखादे तुरळक वाहन सिग्नल बंद झाला की शिस्तीने पट्ट्याशी थांबे. गाड्या रस्त्याला उजवीकडून चालतात. उजवीकडून गाडी चालण्याचा काय फायदा हे कोडे मला अमेरिकेतही पडले होते. असो. रस्त्याची एक लेन स्कूटर-सायकलींसाठी. रस्त्यावर बारीक खडी असल्यासारखी. खड्डे नाहीतच. दुतर्फा हिरवीगार फुलझाडे. काही मोठ्या झाडांच्या बागा. क्वचित फळांनी लगडलेली मोसंबी किंवा डाळिंबाची झाडे. ही फळे कोणी चोरीत नसावे का अशी एक शंका. चौकात मोठी सर्कल्स. छोटासा असला तरी व्यवस्थित फुटपाथ. चालता-चालता अचानक अर्नो नदी लागली. अवघ्या दहा किलोमीटरवर समुद्राला मिळत असली तरी एखाद्या मोठ्या कॅनालएवढीच. तिच्या दुतर्फा भिंती आणि त्याकडेला रस्ते. या बाजूच्या रस्त्याला लुगार्नो म्हणतात. भिंतीवर कोठे इटालियन भाषेत आपल्यासारख्या निवडणुकीच्या जाहिराती चितारलेल्या. अर्नो

नदी पूर्व-पश्चिम वाहते. पिसा शहराचे त्यामुळे उत्तर-दक्षिण असे दोन भाग होतात.

खोलीवर परतल्यावर आवरून नाश्ता करून पुन्हा आणखी अभ्यास केला. दुपारी एकच्या सुमारास भारताचे इतर चौघे आले. दिल्लीचा रथ, हैदराबादचा जुगलकिशोर, जम्मूचा अकीलखान आणि जबलपूरचा सिलास नेल्सन. ते चौघे हैदराबादला ऱ्हुमॅटॉलॉजी शिकले आणि ठरवून एकत्र आले होते. वयाने कमी जास्त असले तरी एकमेकांचे मित्र. म्हणजे मीच तसा उपरा. जुगलकिशोर माझा रूमपार्टनर. रथला एक वेगळा पार्टनर मिळाला होता. नेल्सनची रूम स्वतंत्र तर खानला हॉटेलच वेगळे मिळाले होते. रथच्या पार्टनरला ते माझ्या रूममध्ये ढकलण्याचा प्रयत्न करीत होते. म्हणजे जुगल आणि रथ या दोघांना एकत्र राहता आले असते. बराच वेळ त्यांचा रिसेप्शनपाशी गोंधळ सुरू होता.

दीडच्या सुमारास मला फारच भूक लागली. सकाळी नाश्ता शाकाहारी नव्हता. त्यामुळे कॉर्नफ्लेक्सवरच भागवावे लागले होते. हॉटेलात दुपारच्या जेवणाची सोय नव्हती. रिसेप्शनच्या मुलीला विचारून तळपत्या उन्हात जेवणासाठी हॉटेल शोधायला निघालो. पंधरा-वीस मिनिटे चालत राहिलो. वाटेत कुणाला विचारायची सोय नाही. रविवारमुळे सारे बंद. पाव-बिस्किटेही कोठे मिळेनात. उन्हात चालून घाम फुटलेला. आता खायला काही मिळणार नाही या विचाराने आणखीनच घाम फुटला. अखेर आणखी चालत राहण्यापेक्षा खोलीवर जाऊन सकाळच्या नाश्त्यातले उरलेले सफरचंद खाल्लेले बरे अशा विचाराने परत फिरलो. भूक म्हणजे काय ते समजायला लागल्यापासून पहिल्यांदाच अनुभवले. काल रात्री बाहेर जेवलो असतो तर वीणाने दिलेली लाडू-करंजीतरी आत्ता खाता आली असती. हॉटेलला आल्यावर रिसेप्शनच्या बाईला विचारले. माझ्या एकंदर अवताराकडे पाहून तिला बहुधा माझी दया आली असावी. तिने गुपचूप किचन उघडून चीज, जाम, टोस्ट आणि बिस्किटे असे पदार्थ दिले आणि नखरेल लाडिक सुरात तोंडावर बोट ठेवीत म्हणाली, ''कोणाला सांगू नकोस.'' तिच्या रूपाने मला इटलीत साक्षात अन्नपूर्णाच भेटली.

आतापर्यंत मी कधीच कोणा पार्टनरसोबत राहिलो नाही. दहा-बारा हजार रुपये वाचवण्यासाठी मी पार्टनर घेतला. हैदराबादचा जुगलकिशोर कडेल हा पार्टनर. तो हैदराबादला निजाम इन्स्टिट्यूटमध्ये साडेचार वर्षे होता. दोनच महिन्यांपूर्वी तेथे त्याने राजीनामा देऊन स्वत:ची प्रॅक्टिस सुरू केली होती. रोज पाच-सहा ठिकाणी पेशंट तपासतो. दर शनिवार-रविवार बाहेर गुलबर्गा, नांदेड अशा ठिकाणी जाऊन तेथे ओपीडी चालवतो. दोनच महिन्यांच्या प्रॅक्टिसमध्ये याच्याकडे इटलीला येण्याइतके पैसे कोठून आले, अशी एक माझी पुणेरी कुशंका. पुढे कळले की त्या चौघांनाही कोण्या औषध कंपनीने सहकार्य केले होते. परदेशी जाण्याचीही भारी हौस. पुढच्याच आठवड्यात पाच दिवस सिंगापूर आणि महिनाअखेरीस हाँगकाँग असा कार्यक्रम सांगत होता. आत्ता पस्तिशीच्या वयातच पहिला पासपोर्ट संपला म्हणून त्याने दुसरा एक घेतला होता. दोन महिन्यांच्या प्रॅक्टिसमध्येच दीड कोटी रुपयांचे ऱ्हुमॅटॉलॉजी सेंटर उभारण्याच्या तयारीला लागला होता. आंतरराष्ट्रीय क्लिनिकल ट्रॉयलमधून पैसे उभे करता येतील असे म्हणाला. मी चकित होऊन पाहातच राहिलो. याने काही पेशंट निजाम इन्स्टिट्यूटमधून पळवले असणार. माणूस तसा व्यवस्थित होता, पण त्याचा ओढा इतर खोल्यांतल्या त्याच्या मित्रांकडे. पंधरा-वीस मिनिटांतच आवरून बाहेर पडला. कपडे धुवून सारे बाथरूम ओले करून ठेवले.

संध्याकाळी साडेपाच वाजता कोर्स सुरू झाला. चार वाजता झोपताना अलार्म लावायला विसरलो. पावणेसहाला जाग आली आणि पटकन आवरून खाली गेलो. इथे भिंतीवर घड्याळ नसल्याने वेळच समजत नाही. पहिले प्रास्ताविक अर्धे बुडाले. पुढे लुपस आजार का होतो, याविषयी एक लेक्चर होते. दुसरे लेक्चर 'ड' जीवनसत्त्वाविषयीचे होते. 'ड' जीवनसत्त्वाचे महत्त्व हळूहळू वाढत जाणार असे दिसते.

सात वाजल्यापासून जेवण हेते. जेवणाआधी वाइन असतेच. या कोर्सचे संयोजक डॉ. बोम्बार्देरी आणि गेल्या वर्षीच्या जर्मनीतल्या कोर्सचे बिजस्मा यांच्या सह्या मी माझ्या लुपसच्या पुस्तकावर घेतल्या. त्या कोर्समध्ये आलेली काही मंडळी इथेही आली होती. त्या साऱ्यांची तोंडओळख होतीच. जेवणासाठी मात्र नेमून दिलेल्या टेबलावरच बसायचे. त्यामुळे एकमेकांच्या ओळखी होतील अशी अपेक्षा. जबरदस्तीने केलेला ग्रुप. काय बोलावे? माझ्या टेबलावर पोर्तुगालची एक इंटर्न होती. तिथे फॅमिली डॉक्टर हीसुद्धा स्पेशालिटी असते. त्यासाठी वेगळे प्रशिक्षण घ्यावे लागते. दहा कोटींच्या पोर्तुगालमध्ये एकशे वीस ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट आहेत. आणि आपल्या भारतात जेमतेम चारपाचशे. वेगवेगळ्या देशात फीसुद्धा वेगवेगळी असते. अर्ध्या तासाच्या तपासणीसाठी एक बाई तीस युरो फी घेतात. आपल्याकडे मुंबईला आणि दिल्लीला दोन हजार रुपये फी घेणारे ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट आहेत. पण सामान्यत: फी दोनतीनशे रुपयेच असते. एक इटालियन मुलगी होती. तिला अजिबात इंग्रजी समजत नव्हते. सहा दिवसांच्या या कोर्समध्ये तिला काय कळेल अशी मला शंका आली. असल्या अनोळखी लोकांसोबत दोन तास काढणे म्हणजे कर्मकठीण. जेवणही बेचव. ब्रेडसोबत वाटाणे आणि कसल्यातरी पिठल्यासारख्या पण गिळगिळीत दोन भाज्या होत्या.

**सोमवार, ३१ ऑगस्ट २००९**

आज एकंदर नऊ लेक्चर्स लुपसच्या उपचारांसंबंधी होती. लुपसचे निदान शिकवण्याआधीच उपचारांवर व्याख्याने का आयोजिली असावीत, असे मला उगाचच वाटून गेले. पण


आम्ही सारे मूळचे स्पेशालिस्टच असल्याने विषय कसाही मांडला गेला तरी हरकत नसावी. मी दोन वर्षांपूर्वी शांघायच्या लुपस काँग्रेसलाही गेलो होतो. तेथे आम्हाला लुपॉलॉजिस्ट म्हणत. मला तर लुपस इतका जिव्हाळ्याचा की मी माझ्या क्लिनिकचे नावच लुपस क्लिनिक असे ठेवले. लुपस म्हणजे लॅटिन भाषेत लांडगा. लांडग्यासारखा नकळत, लबाडीने आणि क्रूरपणे हा आजार माणसावर हल्ला करतो. वेगवेगळे अवयव निकामी करतो. ते ओळखणे हे अवघड कौशल्य खरेच; पण त्याचे उपचार हे त्याहून जिकिरीचे असतात. लुपससाठी औषध शोधण्यासाठी पैसे ओतून अमेरिकेतली 'ला होया'सारखी कंपनी बुडाली. गेल्या पंधरा-वीस वर्षांत लुपससाठी एकही रामबाण औषध बाजारात आले नाही. तरीही आहेत तीच औषधे योग्य प्रकारे वापरून ऐंशी-नव्वद टक्के रुग्णांना दहा वर्षांपेक्षा जास्त आयुष्याचा लाभ होऊ शकतो.

हॉटेलमधल्या हॉलमध्ये एसी यथातथाच. खुर्च्या साध्या त्यामुळे अभ्यासक्रमाचे जाड पुस्तक आणि नोट्सची वही धरून अवघडायला होई. भाषेचा प्रश्न होताच. बोलणे समजायला अवघड. सारखे कान टवकारून ऐकायला लागे. कधी शब्दांची इट-इट-इट अशी पुनरुक्ती तर कधी furthurचा फुरदर आणि occurचा ॲक्युअर असा उच्चार. नाकात बोलणे, तोंड वेडेवाकडे करणे, विचित्र हातवारे आणि कसेतरीच हावभाव करणे ते वेगळेच. शब्द समजण्यासाठी क्षणभर विचार करावा तर पुढची स्लाइड येते आणि विषय तुटत जातो. इकडचे लोक सामान्यतः वेळ पाळतात. पण भाषणानंतर चर्चा लांबली की थोडा-थोडा उशीर होत जातो. मला दिवसभर फारच झोपाळल्यासारखे होत होते. एवढा प्रवास आणि वेळेचा बदल यांमुळेच असे होते असे मला वाटते. ''आप तो सो गये थे,'' असे नेल्सन म्हणाला तेव्हा स्टेजवर झोपलेल्या पुढाऱ्याचे छायाचित्र आठवून अगदी लाजायला झाले.

संध्याकाळी लेक्चर्सनंतर विद्यार्थ्यांचे गट करून एक बालिश स्पर्धा होती. आता या वयाला लुपसची कोडी सोडवायला आणि कागदांचे तुकडे जोडून लांडग्याचे चित्र बनवायला काय आवडणार? या विद्यार्थ्यांमध्ये मीच वयाने सर्वांत मोठा. मुळात कोर्सच चाळीस वर्षांपर्यंतच्या तरुणांसाठी. भारतात कोणी लुपॉलॉजिस्ट नाहीत म्हणून मुद्दाम त्यांनी मला कोर्सला परवानगी दिली.

रात्री जेवण तिथेच होते. जेवणानंतर सारे चालत खानला

अर्नो नदी



त्याच्या खोलीवर सोडायला गेलो. खान श्रीनगरला प्रॅक्टिस करतो. बॉम्बस्फोट झाला आणि संचारबंदी लागली की प्रॅक्टिस बंद. मग पुन्हा पूर्ववत झाले की याच्या क्लिनिकमध्ये गर्दी हटत नाही. एकेका दिवशी शंभर-सव्वाशे पेशंट तपासावे लागतात. एका पेशंटला पंधरा मिनिटे म्हटले तर दिवसाच्या बारा-चौदा तासांत एकशे पंचवीस पेशंट तपासण्याचे त्याचे गणित काही मला समजले नाही. सध्या तो श्रीनगरला मोठा बंगला बांधतो आहे. त्यांचे बहुधा एकत्र कुटुंब असावे. वातावरण निवळेल तेव्हा तुम्हा साऱ्यांना घर पाहायला बोलवेन असे म्हणत होता.

रात्री अर्नो नदीच्या किनाऱ्यावर गप्पा झाल्या. नेल्सन मागे जर्मनीला आला होता. तो म्हणाला, ''वाघ सर बहुत अच्छा गाते हैं.'' मग रथने माझ्या गाण्याविषयी चौकशी केली. नऊ वर्षे ग्वाल्हेर गायकी शिकून मी गेल्यावर्षी संगीत अलंकार झालो. रियाजही शास्त्रीय संगीतातच असतो. त्यामुळे पूर्वी येत असलेली बरीच सुगम गाणी मी आता विसरलो. चारचौघात कङ्याचर काही राग आळवता येत नाहीत. रथ म्हणाला, ''बरं, अहिरभैरव म्हण.'' त्यावर मी 'पूछो न कैसे मैने रैन बिताई' गाणे सुरू केले. नंतर यमन रागातले 'जब दीप जले आना' चांगली दोन तास मैफल रंगली. माझ्या हिंदी गाण्यांचा साठा संपल्यावर पुढे खान आणि रथ असे दोघेच आपापल्या सुरात गात राहिले. माझे हिंदी गाण्यांचे ज्ञान यथातथाच. जमेल तसा सूर मिळवीत राहिलो. माझ्या गाण्याने सारेच फार प्रभावित झाले. मी खरेच गाणे शिकलो आहे, हे त्यांना पटले. त्यांना हे पटून मला काही फरक पडणार नव्हता. पण तरीही रथ सर्वज्ञानी असल्यासारखा वागतो. खानही काहीसा तसाच. आपण उगाच न्यूनगंडाने वागतो की काय - असेही एकदा वाटले.

**मंगळवार १ सप्टेंबर २००९**

सकाळी आवरून नाश्त्याला गेलो. कालच्या जागरणाने उठायला उशीर झाला. रात्री बॅगेत व्यवस्थित ठेवलेले बॅज आणि नाश्त्याचे कूपन काही केल्या सापडेना. हल्ली अधूनमधून असेच होते. इथे  रोज सकाळी नाश्त्याला कॉर्नफ्लेक्स, पाव आणि मध असेच खावे लागते. सोबत एखादे फळ. आणि कधी योगर्त नावाचा दह्यासारखा पदार्थ.

आज एकूण तेरा लेक्चर्स होती. सकाळी सकाळी लुपस नेफ्रायटिसची. दुपारी इतर लेक्चर्स होती. नेफ्रायटिस म्हणजे मूत्रपिंडाला सूज येणे. लुपसचा हा एक घातक उपद्रव. त्याचे सहा प्रकार असतात. पहिल्या दोन प्रकारात उपचार नाही केले तरी चालतात. पण लक्ष ठेवून असावे लागते. पुढचे दोन प्रकार वेळीच ओळखून योग्य उपचार केले म्हणजे मूत्रपिंड पूर्ववत होऊ शकते. माझ्या अशा काही केसेस अगदी खडखडीत बऱ्या झाल्या. शेवटच्या दोन प्रकारांत मात्र डायलिसिस आणि मूत्रपिंड बदलण्याचे उपचार लागतात. औषधे कशी वापरायची त्याविषयी मार्गदर्शक तत्त्वे आहेत. त्यानुसार उपचार करीत राहिले म्हणजे बहुतेक वेळा यश मिळते. या भाषणांमध्ये विद्यार्थ्यांनी बरेच प्रश्न विचारले. भाषण झाले म्हणजे प्राध्यापकही समोरच्या रांगेत दिवसभर बसत. शंका आली तर समोरच्या व्याख्यात्याला प्रश्न विचारीत. सारेच येथे शिकण्यासाठी आले आहेत.

असल्या किचकट आजारांचे उपचार करताना वारंवार तपासण्या कराव्या लागतात. औषधांच्या डोससाठी दोन-चार आठवड्यांनी हॉस्पिटलमध्ये एकेका दिवसाकरता राहावे लागते. अर्थातच यासाठी पैसे भरपूर लागतात आणि नातेवाइकांचा आधारही खूप लागतो. आपल्या देशात इतके पैसे खर्च करणे काही जणांना शक्य नसते. युरोप अमेरिकेत राष्ट्रीय आरोग्य योजनेतून सारे खर्च भागतात. अडाणीपणा, अशिक्षितपणा, नातेवाइकांचे चुकीचे सल्ले आणि पर्यायी वैद्यकाचा बाजारी सुळसुळाट. ह्या अडचणी सार्वत्रिकच.

आज लेक्चर्समध्ये फारशी झोप आली नाही. बहुधा शरीराची गाडी रूळावर आली असावी. विषयही आवडीचा होता. रात्री जेवताना ऱ्हुमॅटॉलॉजीच्या प्रॅक्टिसचा विषय निघाला. रथ दिल्लीला एका मोठ्या हॉस्पिटलमध्ये प्रॅक्टिस करतो. त्याची बायको लडाखची. तिला दिल्लीची हवा अजिबात आवडत नाही. कायम घरात एसी लावून बसते आणि याला बिचाऱ्याला थंडी वाजत असते. असो. तो दिवसाकाठी वीसेक पेशंट तपासत असावा. प्रॅक्टिसबद्दल जास्त काही बोलला नाही, पण केसेस बद्दल बरेच सांगत होता. मी अलीकडेच माझी एक केस एका मासिकात प्रकाशित केली. पेशंटला एका औषधामुळे डोळ्यांनी दिसेनासे झाले होते. त्यावर रथने ''असे होऊ शकत नाही,'' असे ठामपणे सांगितले. ज्या केसचा मी इतका अभ्यास केला आणि केस प्रसिद्ध केली त्यावर हा असे कसे बोलतो याचा मलाही जरा रागच आला. काही लोकांना पुरेसा अभ्यास नसतानाही विशिष्ट पद्धतीने बोलून आपले म्हणणे लोकांना पटवण्याचा प्रयत्न करण्याची वाईट सवय असते. मी मात्र आज त्याचे ऐकले नाही. तोही नंतर गप्प बसला. जेवून खोलीवर आल्यानंतर उशिरापर्यंत गण्याचीच मैफल रंगली होती.

**बुधवार, २ सप्टेंबर २००९**

आज पहिलेच भाषण ग्रीसच्या प्रा. येहुदा शोनफिल्ड यांचे झाले. ते फारच प्रभावी बोलतात. उच्चारही तसे स्पष्ट समजतात. भाषणात मुद्दे पुष्कळ असतात. काही प्रश्न उभे करतात. कधी एखादे व्यंगचित्र दाखवतात तर कधी एखादा विनोद करतात. पूर्वी त्यांचे भाषण मी सिंगापूरला आणि शांघायलाही ऐकले होते. आयुर्वेदात मला माझ्या भावी संशोधनासाठी त्यांच्या आजच्या भाषणाचा बराच उपयोग होईल.

त्यानंतरची पाच भाषणे लुपसच्या मज्जासंस्थेवर होणाऱ्या परिणामांविषयी होती. ऱ्हुमॅटॉलॉजीच्या अमेरिकन कॉलेजने याचे

डोकेदुखीपासून फिट येण्यापर्यंत एकंदर अठरा विकार सांगितले आहेत. लुपसच्या बहुतेक पेशंटना डोकेदुखी असतेच. कधी ती ब्लडप्रेशरमुळे, कधी ताणतणावामुळे, कधी मेंदूला सूज आल्यामुळे तर कधी इतर कारणांमुळे. अमुक एखादे लक्षण दुसऱ्या कोणत्या आजारामुळे नाही ना, हे पाहाणेही महत्त्वाचे असते. एकदा निदान नक्की झाले की योग्य औषधोपचार अर्थातच महत्त्वाचे.

आज दुपारी पिसा पाहण्यासाठी अर्धा दिवस सुट्टी होती. थोडी विश्रांती घेऊन सारे साडेचार वाजता लुंगार्नोच्या एका चौकात जमलो. चालत जायला अवघी पंधरा मिनिटे लागली. रविवारी मी दिशाच चुकलो होतो.

पिसा हे जेमतेम नव्वद हजार वस्तीचे प्राचीन शैक्षणिक आणि सांस्कृतिक केंद्र. बाराव्या शतकात त्याभोवती दीड किलोमीटर लांबीची आयताकृती भिंत बांधली. या चौकापाशीच field of miracles (जादुई भाग) आहे. तिथे दोन इमारतींमध्ये छोट्या-छोट्या पुण्यातील तुळशीबागेसारख्या गल्ल्या आहेत. बाजूला तीन-चार मजली इमारती. माध्यान्ह सोडली तर तिथे सावलीच. या रस्त्यावर वाहनांना परवानगी नाही. वाहनांच्या हादऱ्यामुळे इमारती कमकुवत होतील म्हणून. सारा बाजार आणि हॉटेल तिथेच. हॉटेलांनी खुर्च्या रस्त्यापर्यंत टाकलेल्या. पिसा हे पूर्वी व्हेनिससारखे पाण्यातले शहर होते. तिथे एक औसर नावाची दुसरी नदी होती. ती पुढे लुप्त झाली. मातीचा भराव वाढत गेला तसे मध्ये अर्नो नदी राहिली. माती मात्र गाळाची असल्याने मऊ होती. अकराव्या शतकात या जादुई चौकातल्या मुख्य इमारतींचे बांधकाम सुरू झाले. पिसाच्या मनोऱ्याचे दोन मजले बांधून झाल्यावर तो एक बाजूला खचला. पुढे त्याचे काय करावे कळेना. बऱ्याच वर्षांनी दुसऱ्या एका वास्तुशास्त्रज्ञाने पुन्हा काम सुरू केले. कलत्या बाजूचे वरचे खांब उंच आणि पातळ केले तर विरुद्ध बाजूचे उंचीला कमी आणि जाड. त्यामुळे वरचे मजले हळूहळू सरळ झाले. एकूण आठ मजले आहेत. तीनशे पायऱ्या आत जाऊन सारे पाहाता येते. पण तिकिटासाठी तासभराची रांग होती. त्यामुळे आम्हाला ते पाहाता आले नाही.

माती भुसभुशीत असल्यामुळे इकडे बऱ्याच इमारती कलत्या आहेत. रोमन पद्धतीच्या कमानी सगळ्या इमारतींवर. चर्चमध्ये काही कमानी अरेबिकही होत्या. चर्च, बाप्तिस्ट्री अशा वेगवेगळ्या इमारती होत्या. गोलाकार बाप्तिस्ट्री जगातली एकमेव, असे ती गाइड सांगत होती. १२७५ साली चौथ्या पोप अलेक्झान्डरने तेथे हॉस्पिटल बांधले. एक स्मशानही त्यासमोरच आहे. त्या भिंतीवर मोठमोठी पेन्टिंग्ज होती. दुसऱ्या महायुद्धात अणुबॉम्ब पडून तेथे मोठे नुकसान झाले. त्यातले जे उरले ते आता बाजूच्या एका संग्रहालयात आहे. या ख्रिश्चन पद्धतीच्या इमारती कितीही भव्य असल्या तरी त्या चित्रांमध्ये मन काही रमत नाही.

परिसरात इतर ठिकाणांसारखी काचेचे आणि मातीचे मनोरे तसेच इतर वस्तू विकणारी बरीच दुकाने होती. रथला तिथे काहीतरी आठवणीसाठी घ्यायचे होते. तसा मीही प्रत्येक गावाहून एखादी तरी वस्तू आणत असतो. प्रत्येक दुकानात किमती वेगळ्या वाटल्याने मी रथला पुढे चल म्हणालो. तशी दुकाने पुढे नव्हती त्यामुळे त्याची खरेदी राहून गेली. पुढच्या चौकात बांगलादेशी दुकानदार तीन किंवा पाच युरोला वेगवेगळ्या वस्तू विकत होते. त्यातल्या एकाला हिंदी भाषा कळे. त्याने माझ्या मुलीसाठी मी घेतलेल्या मफलरचा एक युरो कमी केला.

बरेच चालून पाय दुखू लागले होते. मी एक युरोचे खोबरे खाल्ले. येताना चौकात एका माणसाने आमच्याकडे पाहून ओळखीचे स्मितहास्य केले. त्यावर खानने त्याला सलाम केला. त्याचे नाव जहीर. तो मूळचा पाकिस्तानचा दोन वर्षे सौदी अरेबियात नोकरी केल्यावर आता गेली दोन वर्षे इथे 'हॅप्पी कबाब' नावाचे हॉटेल चालवतो. मी त्याला विचारले, ''आम्हाला कसे ओळखलेस?'' तो म्हणाला, ''ही सावळ्या रंगाची कमाल. आपल्या दोघांची कातडी एकाच रंगाची आहे.''

रात्री हॉटेलवरच जेवण होते. जेवताना खान आणि रथने माझ्या ऱ्हुमॅटॉलॉजीच्या प्रशिक्षणाविषयी माहिती विचारली. आम्ही हैदराबादला किती कष्ट करून शिकलो याची दोघे फुशारकी मारीत होते, जुगलही आज अधूनमधून बोलत होता. नेल्सन म्हणाला, ''वाघ सर के पास बहुत पेशंट दूर-दूर से आते हैं, उनका नाम पुरे देश में हो गया है.'' खानला माझ्या प्रशिक्षणाविषयी काही शंका असावी. त्याने मला माझ्या प्रॅक्टिसमधल्या पेशंटचे प्रमाण विचारले. आमवाताचे दहा टक्के रोगी असतात असे सांगितल्यावर त्याला ते पटले. खान म्हणाला, ''अलीकडे तू आयसीयूत कोणता पेशंट तपासलास?'' ''पिरिऑडिक पॅरालिसिस मध्ये शोग्रेन सिन्ड्रोम'' असे म्हटल्यावर तो गप्पच झाला. ''ज्या पद्धतीने याने गाण्यावर प्रभुत्व मिळवले, त्याच पद्धतीने ऱ्हुमॅटॉलॉजीतही केले असणार,'' असे रथ म्हणाला. नेल्सनला वाटे मी रोज साठ-सत्तर पेशंट तपासतो. मी बनवलेल्या नव्या ऱ्हुमॅटॉलॉजीच्या सॉफ्टवेअरची त्यांना माहिती सांगितली. सॉफ्टवेअरमुळे वेग वाढत असला तरी इतके पेशंट तपासणे कोणत्याही गणितात बसत नाही, हे मी त्यांना समजावले.

एखाद्या विषयात रस घेतला की झोकून देऊन भरपूर अभ्यास करणे मला आवडते. त्यासाठी मी मुंबईला केईएम हॉस्पिटलच्या अनेक वाऱ्या वर्षभर केल्या. युलारचा दोन वर्षांचा कोर्स केला. एवढ्या कार्यशाळा आणि परिसंवादात पदरमोड करून शिकलो. हॉस्पिटलमधून रजा घेऊन घरी तासन्‌तास अभ्यास केला. शिवाय पंचवीस वर्षांचा प्रॅक्टिसचा अनुभव. रथ आणि खान दोघेही जरा दीडशहाणे वाटले. जुगलही तसाच

गर्विष्ठ - पण लहान असल्यामुळे काही बोलला नसावा. नेल्सन मात्र साधा आहे.

मी चांगला ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट आहे हे खरे तर त्यांना पटवण्याची मला काही जरूर नव्हती. माझे बरे झालेले पेशंट हीच त्याची पावती. पण ते चौघे आणि मी एकटा. त्यामुळे विचारलेल्या गोष्टींची उत्तरे देणे आवश्यक होते. एरव्ही त्यांना मला प्रश्न विचारायचा काय अधिकार? आणि मी तरी त्यांना का उत्तरे द्यावीत?

**गुरुवार, ३ सप्टेंबर २००९**

कालच्या अर्ध्या सुटीनंतर आज पुन्हा पूर्ण दिवस कोर्स होता. त्वचेच्या लुपस विकाराचे दुपारचे सत्र फारच भारी झाले. लुपसच्या एकूण अकरा लक्षणांपैकी पहिली तीन लक्षणे त्वचेच्या संदर्भातली आहेत. उन्हामुळे फुलपाखराच्या आकाराचे गालावर येणारे पुरळ हे एक महत्त्वाचे लक्षण. इतरही बऱ्याच प्रकारचे त्वचाविकार लुपसमध्ये होतात. ते मूत्रपिंड आणि मेंदूविकाराइतके घातक नसले तरी फारच त्रासदायक ठरू शकतात. कधी केस गळतात. कधी तोंडात फोड. अशा नाना तऱ्हा होतात. लुपस बरेचदा त्वचेपुरताच मर्यादित राहतो. अशा पेशंटनी उन्हापासून स्वत:चे संरक्षण केले पाहिजे. त्यासाठी इतर औषधेही आहेत. शेवटच्या लेक्चरला मी जर्मनीच्या डॉ. कुन मॅडमना त्वचेतल्या इंजेक्शनविषयी प्रश्न विचारला. तसा मी नेहमीच उभे राहून शंका विचारत असतो. त्यांच्या उत्तरावरून त्यांना अशा इंजेक्शनचा फारसा अनुभव नसावा असे वाटले. सत्र संपल्यावर मी बाहेर आलो. आणि इंटरनेटसाठी रांगेत उभा राहिलो. ही आजकालची मुले किती भरभर टाइप करतात आणि आपल्याला अजून पुरेसा स्पीड नाही असे मला वारंवार वाटत राहते. माझा नंबर आल्यावर खुर्चीवर बसून मेल तपासू लागलो. तिथे इटलीच्या पडोव्हा युनिव्हर्सिटीचे प्रा. रोन्डीनन आपणहून माझ्याजवळ आले आणि म्हणाले ''डॉक्टर, आम्ही अनेकदा त्वचेत इंजेक्शन देतो. या मी तुम्हाला सांगतो कसे इंजेक्शन द्यायचे ते.'' मी साइन आउट करून पटकन उठलो. वही त्यांच्यासमोर धरली. माझ्या वहीत त्वचाविकाराचे रेखाचित्र काढून आणि माझ्या पेनचा सिरिंजसारखा वापर करून इंजेक्शन देण्याची पद्धत त्यांनी मला शिकवली! ग्रेट. मुद्दाम माझ्याकडे येऊन स्वत:चा वेळ घालवण्याची त्यांना काय गरज होती?

रात्री नॅचरल हिस्टरी म्युझियममध्ये गाला डिनर होते. पिसा हे त्याकाळचे मोठे शैक्षणिक केंद्र. सातव्या शतकात ही मुख्य इमारत बांधली. आणि अठराव्या शतकात दोन्ही बाजूंनी वाढवली. सांताक्रोसपासून हे ठिकाण पंधरा किलोमीटरवर आहे. तिथे वेगवेगळे प्राणी, त्यांचे अवयव आणि सांगाडे ठेवलेले. अगदी कोल्ह्यापासून ते व्हेलमासा आणि डायनासोरपर्यंत. गाईड त्याच्या मोडक्या तोडक्या इंग्रजीत या संग्रहाविषयी बरेच काही सांगत होता. मागे जर्मनीत क्रेफेल्डजवळ पुरातन हातमाग दाखवायला नेले होते. त्या वेळीही असेच बोअर झाले होते. त्या सांगाड्याशेजारी उभे राहून इटालियन बेचव पदार्थांचे गाला डिनर अजिबात रुचले नाही. उकाडाही बराच होता.

जेवणानंतर इतर लोक यायचे होते म्हणून जरा हिरवळीवर गप्पा झाल्या. नेल्सन आता जरा बोलू लागला आहे. त्याचे वडील टांझानियात डायरेक्टर होते. तेव्हा त्यांना मोठे घर आणि मर्सिडिस गाड्या असत. भारतात पंधरा वर्षांपूर्वी परतल्यावर त्यांनी जबलपूरला हॉस्पिटल सुरू केले. देश बदलल्यामुळे नेल्सनच्या वैद्यकीय शिक्षणाचाही पुढे प्रश्न निर्माण झाला. कसेबसे एम. बी. बी. एस. करून हैदराबादला ऱ्हुमॅटॉलॉजीचा अनुभव घेऊन तो प्रॅक्टिस करीत असावा असे मला वाटले. तासांना नेहमी मागच्या बाकावर बसतो. काही बोलत नाही की लिहीत नाही. त्याचे राहणे वागणे मात्र रुबाबदार. कोर्सनंतर तो एकटाच दोन दिवस पॅरिस बघायला गेला.

इतरांची जेवणे व्हायची होती म्हणून हिरवळीवर जरा गप्पा झाल्या. हैदराबादला निजाम इन्स्टिट्यूटमधून ऱ्हुमॅटॉलॉजीच्या प्रसाराचे जसे कार्य झाले तसे मुंबई-दिल्लीला व्ही. आर. जोशी आणि मालवीय यांनी केले नाही, असे खान म्हणत होता. व्ही. आर. जोशी सरांनी किती विद्यार्थी घडवले ते या खानला काय सांगणार? माझ्यासारखे एकलव्यासारखे शिष्य पुन्हा वेगळेच. ते ऱ्हुमॅटॉलॉजीचे द्रोणाचार्य खरेच; पण त्यांनी कोणाकडून अंगठाच काय, कशाचीच कधी अपेक्षा केली नाही. खानच्या बोलण्याचा खरे तर मला राग आला होता. पण तेव्हा त्याच्याशी वाद घालण्यात काही अर्थ नव्हता. मी जरा गप्प झाल्यावर ते चौघे कोणती मुलगी कशी दिसते वगैरे चविष्टपणे गप्पा मारत राहिले.

रात्री अकरा वाजता बसगाड्या परत यायला आल्या तेव्हा पावसाची जोरदार सर आली. इटलीत असा केव्हाही पाऊस पडतो. व्हिएन्ना, बार्सिलोना आणि सॅनफ्रॅन्सिस्कोला मी असाच वेळीअवेळी पाऊस पाहिला. अशा पावसामुळेच इकडे हिरवेगार आणि स्वच्छ राहत असावे.

**शुक्रवार, ४ सप्टेंबर २००९**

आज कोर्सचा शेवटचा दिवस. या कोर्समध्ये लुपस या एकाच आजाराची विविध अंगाने माहिती देणारी सेहेचाळीस भाषणे झाली. इटली वगळता इतर चोवीस देशांतले अठ्ठेचाळीस विद्यार्थी होते; आणि सतरा देशांतले बेचाळीस प्राध्यापक दिसायला सगळे गोरेपान, उंच आणि तगडे. पण उभे राहून बोलायला लागले की उच्चार न समजल्याने सारा मूड जातो. मराठी आणि संस्कृतच्या प्रभावामुळे कदाचित हा माझाच दोष असावा. त्यामुळेच मी कित्येक चांगले इंग्रजी सिनेमेही पाहण्याचे टाळत आलो.

आज लंडन युनिव्हर्सिटीचे प्रा. मार्गीट यांचे भाषण होते. ते बोलताना फारच अडखळतात. मीही पूर्वी असाच अडखळायचो. आत्मविश्वासाचा अभाव हे अडखळण्याचे फार मोठे कारण आहे. नव्याण्णव टक्के अडखळणे हे मानसिकच

असते. एम. डी. परीक्षेच्या वेळी मी त्यावर महत्प्रयासाने मात केली. आपल्याला जे मांडायचे त्याविषयीचे विचार स्पष्ट पाहिजेत. बोलण्यासाठी पुरेसा श्वास पाहिजे. अडखळले तरी न बिचकता बोलत राहिले पाहिजे. बोलण्यात लय पाहिजे. गाताना मी अडखळत नसे ते या लयीमुळेच. असो.

दुपारी कोर्स चालू असताना एक वेगळीच गडबड झाली. परतीचे विमान दुसऱ्या दिवशी सकाळी होते म्हणून मी एक दिवस जास्त राहिलो होतो. हॉटेलवाल्यांनी आमची डबलरूम रद्द करून मला एका रात्रीसाठी सिंगल रूम दिली. आणि दुपारी बारा वाजता रूम रिकामी करण्याची घाई करू लागले. दुसरी रूम मात्र रिकामी नव्हती. त्यामुळे घाईघाईने ते सामान बॅगेत भरून बॅग खाली काउन्टरपाशी ठेवली. पुढे तासाभराने दुसरी खोली मिळाली तेव्हा पुन्हा ते सामान वरच्या मजल्यावर चढवले. इतर चौघांना दुसरे हॉटेल मिळाले. त्यामुळे त्यांनी त्यांचे खोल्या आवरून सामान माझ्याच खोलीत टाकले. या असल्या पसाऱ्याची मला अजिबात सवय नाही.

बुधवारी खरेदी करायची राहिली म्हणून खान आणि रथ कोर्स संपल्यानंतर लगेचच बाहेर पडले. त्या मागोमाग जुगल आणि नेल्सन गेले. मी एकटाच राहिलो. खरे तर साऱ्यांनी एकत्र जायला हवे होते. पण माझ्यासाठी कोणीही थांबले नाही. पुढे मी एकटाच बाजारात गेलो. दरवेळी खरेदी तरी काय करायची, असा मोठा प्रश्न असतोच. मुलींचे कपडे छान दिसतात पण मापाचा अंदाज येत नाही. शिवाय गळेही फार उघडे असतात. स्वस्तातली वस्तू बघावी तर ती चीन, तैवान किंवा कोरियात बनवलेली. अखेर मी काचेची दोन इटालियन भांडी घेऊन खोलीवर परतलो.

थोड्या वेळाने ते चौघे आले आणि आपापले सामान घेऊन गेले. मी मग जरा खोली आवरून बॅगही आवरली. रात्री साडेआठ वाजता जहीरच्या हॉटेलात पोचलो. तिथे कुराणाचे भित्तिपत्रक लावलेले होते. त्यामुळे रथ वगैरेंची अपेयपानाची इच्छा अपुरी राहिली. रमझान असूनही जहीर ते भित्तिपत्रक काढतो म्हणाला. त्यावर खान नको म्हणाला. माझ्यासाठी आणि रथसाठी शाकाहारी बर्गर मिळाले. इतरांनी चवीने कबाब खाल्ले. जहीर म्हणाला, ''भारत आणि पाकिस्तान यांच्यात अशांतता राहणे अगदी गलत आहे. युद्धाच्या तयारीसाठी सैन्यावर जो खर्च होतो तो वाचवला तर दोन्ही देश कितीतरी प्रगती करतील. खरे तर फाळणीच झाली नसती, दोघे एकच राहिले असते तर केवढी मोठी ताकद निर्माण झाली असती.'' साऱ्यांचीच त्याला सहमती होती. आपल्याकडचे कोणी भेटले म्हणून जहीर फारच भावनाविवश झाला होता. बिलाचे पैसेही घेईना. शेवटी बळेच त्याच्या हातात पैसे कोंबून मी बाहेर पडलो.


**विविध भाषांतील वाचकांवर अधिराज्य गाजवणारा पाउलो कोएलो मराठीत**

वाचकांना भावनावश करणे किंवा अंतर्मुख करणे एवढ्यापुरते मर्यादित नाही तर, वाचकांचे संपूर्ण जीवनच बदलून टाकणारे पुस्तक. विविध देशातील पंचावन्नपेक्षा अधिक भाषांत अनुवादित झालेली, जगाला वेड लावणारी कादंबरी.

द अल्केमिस्ट
पाउलो कोएलो

**अनु. नितीन कोत्तापल्ले**

पृष्ठ १६० । मूल्य १३० रुपये

विशाल शक्यतांच्या या जगात सच्चा माणूस असणं म्हणजे काय याचा ही कादंबरी एक परिपाठच. पूसटची झलक याची सुरुवात करून देते शेवटी सुरू होते एक ध्यासपर्व. द अल्केमिस्टनंतरची पाउलोची जबरदस्त कलाकृती.

द जहीर

**पाउलो कोएलो**

**अनु. नितीन कोत्तापल्ले**

पृष्ठ २९६ । मूल्य २३० रुपये

पद्मगंधा प्रकाशन

**पद्मगंधा प्रकाशन** ३६/११, धन्वंतरी सह. गृहरचना संस्था, पांडुरंग कॉलनी,
एरंडवन, पुणे-४११ ०३८ फोन : (०२०) २५४५५३८५, २५४४२४५५
Website : www.padmagandha.com E-mail : arunjakhade@padmagandha.com

सांताक्रोस हॉटेलवर आलो तर तिथे आमच्यासाठी जेवण मांडलेलं, वेटर म्हणाला, ''आम्ही तुमच्यासाठी थांबलो आणि तुम्ही बाहेर जेवून आलात.'' एका टेबलावर माझ्यासारखीच जादा रात्रीसाठी थांबलेली सात-आठ मंडळी होती. तेथे गप्पा मारीत बसलो. त्यांना माझ्या वेबसाइटची माहिती सांगितली. आता पुन्हा केव्हा भेटणार या विचाराने सारेच फार भारावले होते. 'यथा काष्ठंच काष्ठंच समेयाताम् महोदधौ' तसे.

**शनिवार ५ सप्टेंबर २००९**

पहाटे चार वाजता उठलो. इतक्या लवकर उठायचे असले म्हणजे रात्रभर धड झोप येत नाही. साडेपाचला गाडी आली. नेल्सनचे पॅरिसचे विमान उशिरा होते. बाकीचे तिघे विमानतळावर भेटले. रथ आणि खान वेगळ्या विमानाने आधी निघाले. रथ नोव्हेंबरात जयपूरला भेटू, म्हणाला. खानने खास आलिंगन दिले. आता पुढे जेव्हा केव्हा श्रीनगरला तणावाची बातमी येईल तेव्हा त्या आलिंगनाची मला नेहमी आठवण येत राहील. योग, उर्दू भाषा, आयुर्वेदातली ऱ्हुमॅटॉलॉजी अशा वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास करण्याच्या माझ्या मनसुब्याचे खानला नेहमीच कौतुक वाटे.

जुगल आणि मी एकाच विमानाने पॅरिसला आलो. सिक्युरिटीची रांग मोठी होती आणि वेळ थोडा. आमच्यापुढे आठ-दहा जणांचे एक आफ्रिकी कुटुंब होते. प्रत्येकाकडे एक मोठासा थैला होता. त्यात काय काय कोंबलेले. दोन लिटरची कोकची बाटली कुणी हौसेने घेतली होती. सिक्युरिटीचा नंबर येईपर्यंत इतरांना आग्रह करून ती तो सारा कोक संपवण्याचा प्रयत्न करीत होती. एवढा मोठा कोक का घेतलास, असे बहुधा एक बाई त्या मुलीला रागावत होती. त्यातच त्या कुटुंबातल्या आणखी दोनचार बाया बाहेरून येऊन आमच्यापुढे घुसल्या. तरीही या लोकांच्या नादी न लागलेले बरे, असे मी जुगलला सुचवले. अमेरिकेत मुलाच्या मित्राकडे दोन-तीन काळ्या लोकांनी येऊन कसे घरातले सारे उचलून नेले ते मला आठवले. सौंदर्याच्या कोणत्या मापात ही मंडळी बसतात हे मला कधीच उमजले नाही.

अखेर सिक्युरिटीला उशीर होऊन विमान चुकते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. कोणीतरी आले आणि त्याने आम्हाला वेगळ्या मार्गाने नेले. त्यांनाही बहुधा अशा लोकांचा अनुभव असावा. सिक्युरिटीतून सुटलो तर जुगल कुठेसा खरेदीला गेला. अखेर दोघे बसमध्ये चढून विमानात बसलो तेव्हा कुठे सुटकेचा नि:श्वास सुटला

विमानात बसल्याबसल्या पुण्याचे वेध लागले. डिसेंबरला मिहिरचे लग्न म्हणून घराचे रंगकाम सुरू झालेले. पेशंटसाठी रोज दहा-पंधरा फोन येत. सोमवारपासून क्लिनिकला किती गर्दी होईल कुणास ठाऊक. त्यात एक सहकारी सिंगापूरला गेलेली.

जागरण, खाण्याचे अपथ्य आणि प्रवासाच्या ताणाने डोळे दुखू लागले. त्यासाठी एक गोळी घेऊन झोपी गेलो आणि उठल्यावर पुन्हा नेहमीसारखे पुस्तक काढून वाचू लागलो. जुगल माझ्या मागच्या सीटवरच होता. त्याने दोन-तीन सिनेमे पाहिले. रात्री मुंबईला पोचायला उशीर झाला. विमानातून बाहेर पडताना 'बाय' म्हणून जुगल तरातरा पुढे चालत गेला. सामानाच्या पट्ट्यापुढे दूर विरुद्धबाजूला एकदाच दिसला. पुढे तो कुठे गेला कुणास ठाऊक. खरे तर त्याचे हैदराबादचे विमान दुसऱ्या दिवशी होते आणि तो विमानतळावरच सारी रात्र काढणार होता. थोडा थांबून चार शब्द बोलला असता तर काही बिघडले नसते.

असल्या आंतरराष्ट्रीय सभांमध्ये पूर्वीही वेगवेगळे लोक माझ्या सोबत होते. दोन-चार दिवस जीवाभावाच्या गोष्टी होत. त्यातल्या काहींची पुढे नावेही आठवत नाहीत. व्हिएन्नाला सोबत आलेल्या एका गुवाहाटीच्या ऱ्हुमॅटॉलॉजिस्टचे नाव मला आज प्रयत्न करूनही आठवत नाही. दिल्लीच्या दुग्गल आणि सिंघलमध्ये माझा नेहमीच घोटाळा होतो. काही मंडळी पुन्हा कोठे कॉन्फरन्सला भेटली तर हॅलोच्या पलीकडे जास्त बोलणे होत नाही. काही मंडळी तेव्हा छान वाटली. पण पुढे त्यांच्याविषयी बऱ्यावाईट गोष्टी कळल्या. पुण्यात आम्ही दोघेच ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट. त्यामुळे त्याचा मित्र असलेला कोणी माझ्याशी अंतर ठेवून राहतो. बंगलोरचा महेंद्रनाथ, जयपूरचा शर्मा, अहमदाबादचा पंड्या, हैदराबादचा राव, कोलकात्याचा अलकेन्दु घोष, अगदी पुण्याचा चोप्रासुद्धा – सारे कामापुरते बोलतात. त्यामुळे त्या ओळखीच्या माणसांच्या गर्दीत आपल्याला एकटे वाटत राहते. कदाचित ते मला अडीअडचणीला मदतही करतील. दिल्लीचा हांडा मात्र आपुलकीने बोलतो. आईच्या तब्येतीची चौकशी करतो. माझ्या घरातले तंबोरे आणि कपडे वाळत घालण्याचा स्टॅण्ड यांची इतरांपाशी स्तुती करतो. तो अलीकडेच असोसिएशनचा अध्यक्ष झाला आहे. मतपत्रिका आली की लगेचच मी त्याच्या नावापुढे फुली मारून उलटटपाली पाठवतो. तो राजकारणी आहे, असे कोणी म्हणतात. असो.

एक मात्र खरे, या साऱ्या भटकंतीमुळे भारतात आणि भारताबाहेर मी अनेकांना माहीत झालो. माझा सखोल अभ्यास, माझी नवनवे शिकण्याची आस, आयुर्वेदाचे ज्ञान, ऱ्हुमॅटॉलॉजीतले प्रावीण्य आणि गाण्याची कला. हे सारे त्यांच्यापर्यंत पोचले. दिल्ली, हैदराबाद किंवा कोलकात्याचा पेशंट पुण्याला यायचा असेल तर ते त्याला माझे नाव सुचवतात आणि कॉन्फरन्सच्या रात्री डिनरला आग्रहाने मला गायला सांगतात. हेही नसे थोडके.

❑

**श्रीकांत वाघ ।** लुपस क्लिनिक, १०७८ शुक्रवार पेठ, टिळक रस्ता, हिराबाग, पुणे–४११०२२
फोन : २४४७८९९३, २४२१२११९ मो : ९८२२०३२३७३ sywagh@yahoo.co.in, www.arthritis-india.com